भूषण सांभ शिखरे गुरूजी
निनाद भूषण शिखरे गुरूजी
श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर जिल्हा नाशिक.
(०९४२२२६८५९६ / ०८१४९४७११९४)
(फोनची वेळ फक्त सायं ५ ते रात्री १० पर्यंत)

अधिक व अधिकृत संकेतस्थळ आपणासाठी खाली आम्ही आपणास उपलब्ध करून दिलेले आहेत.तेथे जाऊन आपण श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर मध्ये होणाऱ्या संपूर्ण धार्मिक पुजाविधी संदर्भात अधिक माहिती प्राप्त करवुन घ्यावी.

https://grahsanket.shikharebs.com

(येथे मी फक्त श्राद्धविधीबद्दलचा दृष्टिकोन,समज-गैरसमज,अन्य प्रश्न या संदर्भात लिहिले असून श्राद्धविधींचे ग्रंथांमधील संदर्भ,दाखले, तपशील,कर्मकांडे,विधी,प्रचलित चालीरीती,त्यांची योग्य-अयोग्यता याबद्दल काहीही लिहिले नाही.)

!! श्राद्ध,पितृपक्ष,पुनर्जन्म आणि त्यावरील अनेक शंका !!

( खास आणि विविध माहिती असल्याने कृपया पूर्ण लेख वाचावा )

एकदा पितृपंधरवडा सुरु झाला की ईमेल,व्हॉट्स अप,फेसबुक इत्यादी माध्यमांमधून या विषयाची बरीच टिंगल वाचायला मिळते. पितरांप्रती आदर व्यक्त करण्याच्या प्रथा तर सगळ्याच धर्मांमध्ये आहेत आणि त्या त्या धर्मातील बहुतेक सर्वजण त्या पाळतात.पण याची सर्वाधिक पुरोगामी टिंगल फक्त हिंदू धर्मातच होते.याबाबत प्रामुख्याने तीन विचारांचे गट असतात.

१) हे सर्व कांही थोतांड असून आज विज्ञान इतकी प्रगती करीत असताना या अंधश्रद्धा कशासाठी,असे विचारणारा एक गट.

२) आपण यातले काही केले नाही तर पूर्वज आपल्याला भयंकर त्रास देतील आणि आपल्या सध्याच्या त्रासाला हेच कारण असावे,असे मानणारा दुसरा गट.

३) जमेल तसे थोडेतरी काही करावे,असे वाटते पण याच्या अंतर्गत केली जाणारी व किचकट वाटणारी कर्मकांडे आणि कडवी विरोधी टीका यामुळे गोंधळलेला तिसरा गट.

सुदैवाने माझी या विषयातील काही चांगल्या जाणकारांची भेट झाली.मला स्वतःला अनेक अनुभव आले.त्यावरून अनेक निष्कर्ष काढता आले आणि ते माझ्याच FAQ आणि अन्य शंकांना खुपसे अचूक उत्तर देणारे आहेत.मी यापूर्वीही या विषयी थोडे लिहिले आहे पण लोकांना गोंधळात टाकणारे लेख पुन्हा पुन्हा येऊ लागले की त्याच्या खुलाशासाठी मलाही काही मुद्द्यांच्या पुनरावृत्तीसह,पुन्हा लिहावेसे वाटते.म्हणूनच हा आजचा लेख.सर्वात आधी माझी त्यांना विनंती आहे की मी हे जे काही लिहितो आहे ते,ज्यांना काही करायचेच आहे पण कर्मकांडे आणि अन्य गोष्टींबद्दल गोंधळ आहे,त्यांच्यासाठीच आहे.ज्यांना हे सर्व थोतांड आहे -- याची काहीही गरज नाहीये -- विज्ञानाची प्रगती झाली आहे वगैरे,असे कांही वाटते त्यांच्या मताचा मला पूर्ण आदर आहे.त्यामुळे ज्यांचा यावर विश्वासच नाही त्यांनी कृपा करून याबाबत काही मते मांडू नयेत ही विनंती ! या संदर्भामध्ये एकेक मुद्दा आपण पाहू या --

**१) मृत्यूनंतर माणसाचे काय होते?.** मृत्यूनंतरचे जीवन आणि मोक्षाची जी संकल्पना,हिंदू धर्मामध्ये मांडलेली आहे तशी अन्य कुठल्याही संस्कृतीत इतक्या परिपूर्णपणे मांडलेली नाही.यासाठी फक्त हिंदू धर्मामध्येच हजारो वर्षे प्रचलित असलेल्या पुनर्जन्म,कर्म सिद्धांत, पंचमहाभूतांनी बनलेला मनुष्य देह,यासारख्या गोष्टी मान्य केल्याशिवाय पुढची सर्व वाटचाल ही

अगम्यच राहते. पण या गोष्टी एकदा मान्य केल्या तर मग जन्ममृत्यू साखळीतील एकही गोष्ट अगम्य( unsolved )रहात नाही.सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ चार्ल्स डार्विन यांच्या उत्क्रांतीवादाच्या शोधाच्या हजारो वर्षे आधी हिंदूधर्मातील उत्क्रांतीचे तत्वज्ञान हेच सांगत आले आहे.अगदी ढोबळमानाने एखाद्या एकपेशीय जीवापासून उत्क्रांती होत होत सजीव तयार झाले असा थोडक्यात डार्विनचा सिद्धांत!हिंदू धर्मातील तत्वज्ञान काय सांगते? सप्तपाताळ,मानवलोक आणि सप्तस्वर्ग हे काय आहे?.लक्ष चौऱ्यांशी जन्मांनंतर मनुष्य जन्म लाभतो,म्हणजे काय?डार्विनला फक्त देहाचीच उत्क्रांती सांगता आली.हिंदू धर्मात देहाबरोबरच त्याचे पूर्वकर्मफल,पापपुण्य,प्रगती/अधोगती अशा अनेक गोष्टींचा एकत्रित विचार केलेला आहे.विज्ञानाला मनुष्य जन्मापर्यंतच उत्क्रांती सांगता आली आहे.पण आपल्या धर्माने मात्र पुढे भूः, भुव,महा,जन,तप आणि सत्य लोक,असे नंतरच्या उत्क्रांतीचे टप्पेही सांगितलेले आहेत.तेथील कामकाजाची माहितीही दिली आहे. माणसाच्या मृत्यूनंतर त्याचा देह(कोष)गळून पडला तरीही प्राणमय,मनोमय,विज्ञानमय, ज्ञानमय हे कोष तसेच राहून पुढे प्रगती करतात.मनुष्यदेहातील पाणी,वायू,अग्नी,आकाश या ऊर्जा (energy)असल्याने law of indestructibility of energy नुसार त्या नष्ट न होता अनंतात विलीन होतात म्हणजे एका मोठ्या कोषात(Universal Reservoir)खेचल्या जातात.तर शरीराचे material जळून ते अन्य अनेक materials मध्ये रूपांतरित होते.

२) **विज्ञान इतके प्रगत झाले तरी?.** आपण नेहेमी ऐकतो की "विज्ञानाची इतकी प्रगती झाली आहे की आता माणसाची पावले चंद्रावर सुद्धा उमटली "! ..पण एक अतिशय महत्वाची गोष्ट आपण विसरतो.माणसाचे चंद्राला पाय जरी लागले तरी त्या चंद्रामुळे पृथ्वीवर येणारी भरती आणि ओहोटी बंद झालेली नाही.त्याचा आपल्यावर होणारा परिणाम बदललेला नाही.

३) **अमर आत्मा,नश्वर देह म्हणजे?.** माणसाचा देह हे जरी material असले तरी आत्मा ही नष्ट न होणारी शक्ती आहे.येथे एक महत्वाचा फरक असा की,या शक्तीलाही एक किंवा अनेक जन्मांमधून तयार झालेल्या आसक्ती,भावभावना, इच्छा असतात.हिंदू तत्वज्ञानानुसार जिवंत माणूस हा त्याच्या,देह सोडून गेलेल्या पूर्वजांच्या आत्म्यांच्या साखळीचाच एक भाग असतो.

४) **जाडजूड माणसाच्या आत्म्याला चमचाभर वाढलेले पदार्थ कसे पुरणार? डायबेटिस वाल्याला गोड नैवेद्य?.** अत्यंत महत्वाची गोष्ट --- माणसाच्या देहाच्या आकाराच्या प्रमाणात त्याला कमी अधिक अन्न लागते.पृथ्वीवरील भौगोलिक भागाप्रमाणे त्याच्या अन्नाच्या आवडीनिवडी आणि प्रमाण बदलू शकते.पण देह सोडल्यावर आत्म्याला अन्नाचा केवळ वास पुरेसा असतो.त्यामुळे तेथे quantity ला स्थानच नसते.त्याच्या वासानेच तो तृप्त होतो,म्हणूनच आत्म्याला ठेवल्या जाणाऱ्या जेवणाच्या पानावर वासापुरते थोडेथोडे अन्न वाढले जाते.त्याचप्रमाणे त्या आत्म्याला अन्नातील नक्की कुठला रस आवडेल याची कल्पना नसल्याने चवीच्या सर्व रसांचे म्हणजे-कडू,गोड,तिखट,खारट,तुरट आणि आंबट अशा सर्व चवीचे पदार्थ श्राद्धाला केले जातात.उदा -कारल्याची भाजी,आवळ्याची-आमसुलाचे चटणी,लाडू-खीर,वडे,गवार-भोपळ्याची भाजी इ!तीव्र मधुमेह असलेल्या माणसाने जिवंतपणी गोड खाणे पूर्ण बंद केले असले तरी अशा व्यक्तीच्या मृत्युनंतर,त्याला ते बंधन पाळायची गरज नसते.मधुमेह शरीराला असतो,आत्म्याला नाही.उलट त्याला गोड खाण्याची अधिक तीव्र आसक्ती झालेली असू शकते.

५) **श्राद्धाने सगळेच पितर कसे शांत होणार?.** आणखी एक महत्वाची गोष्ट अशी आहे की,आपल्या शास्त्रात पितरांच्या ३ पिढ्यांना आवाहन केले जाते.तथापि त्याबरोबरच कुटुंबातील त्या आधीच्याही मोक्ष/मुक्ती/सद्गती न मिळलेल्यांना, ज्यांच्यावर रीतसर दहनसंस्कार होऊ शकले नाहीत अशांना,गर्भातच मरण पावलेल्यांना,तसेच विविध अवस्थेत मृत पावलेल्यांना अन्न/पिंड दिले जातात.शस्त्राघाताने मृत्यू आलेल्या,घातपाताने मरण आलेल्या,संन्यास घेतलेल्या इत्यादी पूर्वजांसाठी करायच्या श्राद्धासाठी विशिष्ट दिवस राखून ठेवण्यात आले आहेत.

६) **श्राद्धाला पुरोहितच मिळाला नाही तर?.** एखाद्याने संगीताचे उत्तम प्रशिक्षण घेतले तर तो अधिक चांगले गाऊ शकतो.पण म्हणून बाकीच्यांनी गाऊच नये असा नियम नाही.म्हणूनच श्राद्धासाठी जर जाणकार पुरोहित मिळाला नाही,जेवणा साठी शात्रोक्तपणे पदार्थ करता आले नाहीत,सगळी कर्मकांडे करणे शक्य झाले नाही,कुठल्याही कारणामुळे परवडत नाही,असे असेल,तरी अत्यंत श्रद्धेने अर्पण केलेला अन्ननैवेद्य पितरांना नक्कीच पोचतो.अशा प्रकारे पितरांची आठवण करून त्यांना काही अर्पण करण्याची पद्धत सर्वच धर्मात अस्तित्वात आहे.पण इतके स्वातंत्र्य असूनही फक्त हिंदू धर्मातच त्याची सर्वाधिक कुचेष्टा केली जाते.

७) **कशावरून हे सर्व पितरांना पोचते?.** एक विचार करा.आपण देवाला,भरभरून देण्याची प्रार्थना करतो आणि फक्त पाचच पेढ्यांचा नैवेद्य दाखवतो.तो देवापर्यंत पोचतो की नाही याचा विचार कधी करतो का? किंबहुना तो पोचतच नाही कारण तो प्रसाद म्हणून आपणच खातो.म्हणूनच आपण त्याला शब्दही नैवेद्य "दाखविणे" असाच योजला आहे.मग जर आपण ३६४ दिवस पितरांसाठी काहीही करीत नाही आणि केवळ सर्वपित्रीच्या एक दिवशी,सर्व पितरांसाठी मिळून चमचा चमचा वाढलेल्या अन्नाचा इतका विचार कशासाठी करायचा?समजा पितरांपर्यंत नाही पोचले तरी कावळा आणि इतर पक्षी,कीटक,प्राणी हे तरी ते अन्न खातीलच ना?

८) **हिंदू श्रद्धा विधींबद्दलच माध्यमांमधून कुचेष्टा,टीका का होते?.** हल्ली मृत माणसांच्या नावाने वृत्तपत्रांमधून,त्यांच्या मृत्यूनंतर वर्षानुवर्षे त्यांचे फोटो,कविता,बॅनर,जाहिराती श्रद्धांजलीचा मजकूर अशा गोष्टी हजारो रुपये खर्चून छापून आणल्या जातात.अगदी कळकळीने भावना व्यक्त केलेल्या दिसतात.व्हॉट्स ऍप,फेसबुक यावरूनही हे मेसेज फिरतात.कशावरून ते या मृत व्यक्तींना/पितरांना पोचते,असा प्रश्न कुणीही विचारात नाही.त्यापेक्षा या जाहिरातींचे हजारो रुपये,गरिबांना द्या,असे कुणीही का म्हणत नाही?.बहुतेक सगळी वृत्तपत्रे ही ढोंगी,दुटप्पी आणि फक्त हिंदूंच्याच बाबतीत पुरोगामी आहेत.पण ती देखील असल्या जाहिराती छापून पैसे कमविण्याचा धंदा करतातच ना!याशिवाय अन्य धर्मांवर टीका करणे त्यांना खूप महागात पडते हे त्यांनी वारंवार अनुभवले आहे.

९) **श्राद्धाला जेवणा ऐवजी कोरडा शिधा द्यावा का?.** आपल्या धर्मानुसार या आत्म्यांना अन्न अर्पण करणे फार महत्वाचे मानलेले आहे.त्या ऐवजी कांही मंडळी कोरडा शिधा(तांदूळ,गहू,साखर,डाळ इत्यादी)अर्पण करतात.एखादा अत्यंत भुकेला माणूस तुमच्या पुढे उभा आहे.त्याला त्यावेळी तुम्ही जरी १/१ गोण भरून डाळ,तांदूळ असे पदार्थ दिलेत तर त्यावेळी त्याची भूक भागेल का?.ते तुमचे पुण्यकर्म ठरेल पण श्राद्ध मात्र नक्कीच ठरणार नाही.!

१) **जिवंतपणी स्पष्ट नको असे सांगितले असेल तरी त्यांचे श्रद्धा कशाला करायचे ?** तुमच्या दिवंगत आईवडिलांनी तुम्हाला अगदी स्पष्ट सांगितले असेल/लिहून ठेवले असेल की,त्यांचे क्रियाकर्म,श्राद्ध करू नका,तरीही त्यांच्या मृत्युनंतर या गोष्टी तुम्ही नक्कीच करा.कारण माणसे असे कांही सांगतात तेव्हां त्यांचे विचार हे इथल्या अनुभवानुसार आणि ज्ञानानुसारच असतात.आपल्या पश्चात बाकीच्यांना कशाला त्रास द्यायचा,असा विचारही असू शकतो.पण निधनानंतर परलोकात गेल्यावर,आपण मुलांना असे सांगून चूक केली आहे,असे जर त्यांच्या लक्षात आले तर ते तुम्हाला पुन्हा येऊन "माझे श्राद्ध कर रे बाळा" असे सांगूच शकत नाहीत.त्यामुळे हजारो वर्षे आपल्या धर्मात अस्तित्वात असलेले विधी,एक दिवस करायला काय हरकत आहे?

११) **श्राद्धाऐवजी देणगी?.** दिवंगत पूर्वजांच्या स्मृतीप्रित्यर्थ एखाद्या संस्थेला देणगी देणे,पाणपोई/विहीर बांधणे,मंदिराला दान देणे ही सर्व खूप मोठी सत्कार्ये/पुण्यकर्मे आहेत.पण हे

श्राद्धाला पर्याय नक्कीच नाहीत.

१२ ) **हिंदूंचे धर्मशास्त्र हे विज्ञानच आहे !** मेटा सायन्सचे श्री.जॉर्ज मिक यांनी लिहिलेले "आफ्टर वुई डाय व्हॉट देन?" नावाचे एक पुस्तक आहे.त्याचा मराठी अनुवाद("मृत्यूनंतर होते तरी काय?.अनुवाद-पद्मा कुलकर्णी)पुण्याच्या प्रसाद प्रकाशनाने प्रसिद्ध केला आहे.त्यात मिक यांनी या विषयावर जगभर केल्या गेलेल्या शेकडो प्रयोगांची माहिती दिली आहे.या प्रयोगांमध्ये जगभरातील कित्येक डॉक्टर्स,वैज्ञानिक,तज्ज्ञांनी भाग घेतला होता.या पुस्तकात त्यांनी अनेक आकृत्या,छायाचित्रे,अगदी आत्म्याची छायाचित्रेही दिली आहेत.त्यात कुठेही हिंदू तत्वज्ञानाचा पुसटसा उल्लेखही केलेला नाही.तरीही त्यांचे सर्व निष्कर्ष मात्र,हिंदू धर्मांतील या विषयीची सर्वच्या सर्व अनुमाने खरी आहेत यावर शिक्कामोर्तब करणारे आहेत.ज्या ख्रिश्चन धर्मात पुनर्जन्मच नाही,तो धर्म मानणारे शास्त्रज्ञ या विषयावर संशोधन करायला कचरत नाहीत.मात्र या विषयावर आपल्याकडे सुसंगत सिद्धांत असूनही त्यावर संशोधनच होत नाही.आपल्याकडे या सर्व गोष्टी भंपकपणा,अवैज्ञानिक,अंधश्रद्धा म्हणून आधीच फेटाळल्या जातात.ज्याचे पुरावे आपल्याला सापडले नाहीत किंवा शोधता आलेले नाहीत "त्या गोष्टी असूच शकत नाहीत" असे आपल्याला म्हणता येणार नाही हे सर्वात महत्वाचे आहे.

या धर्माला,देशाला,संस्कृतीला हजारो वर्षांचा इतिहास आहे.आजवर येथे कोट्यवधी लोकं जन्म घेऊन गेले.जगातील पहिले विद्यापीठ या देशात होते.आजच्या सर्व आधुनिक विद्या,ज्ञान स्थापत्य,कला,तत्वज्ञान,आयुधे,यंत्रे आपल्या पूर्वजांना शेकडो वर्षांपासून ज्ञात होती. अशा आपल्या प्रगत पूर्वजांनी हजारो वर्षे पाळलेले धार्मिक विचार,व्यवहार इतके चुकीचे असू शकतील?.बिनडोक आणि निरुपयोगी असतील?.